# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २७ डिसेंबर २०१८

# पाच नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी २७ जानेवारी २०१९ रोजी मतदान

मुंबई, दि. २७ (रा.नि.आ.): कर्जत (जि. रायगड), मलकापूर (जि. सातारा), श्रीगोंदा (जि. अहमदनगर), आरमोरी (जि. गडचिरोली) या नगरपरिषदा व महादुला (जि. नागपूर) नगरपंचायतीच्या सार्वत्रिक; तसेच विविध नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील ११ रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी २७ जानेवारी २०१९ रोजी मतदान होणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, २ ते ९ जानेवारी २०१९ या कालावधीत नामनिर्देनपत्र स्वीकारली जातील. नामनिर्देनपत्रांची १० जानेवारी २०१९ रोजी छाननी होईल. मतदान २७ जानेवारी २०१९ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० यावेळेत होईल. मतमोजणी २८ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

**पोटनिवडणूक होत असलेली नगरपरिषद/ नगरपंचायतनिहाय जागा अशी: राजापूर** (जि.रत्नागिरी)- ६अ, **आळंदी** (पुणे)- ९अ, **फलटण** (सातारा)- १२अ, **दुधनी** (सोलापूर)- २ब, **पन्हाळा** (कोल्हापूर)- ८क, **दिंडोरी** (नाशिक)- १५, **यावल** (जळगाव)- १अ, **बीड**- ११अ, **बुलढाणा**- १२ब, **अर्जुनी** (गोंदिया)- १४, **गोरेगाव** (गोंदिया)- १४.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)